RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१८५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ रविवार दि.१८ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## रशिया भूकंपाने हादरला; ज्वालामुखीचा उद्रेक; त्सुनामीचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ कामचटका रशिया**

रशियामध्ये आज (दि.१८) पहाटे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ७ इतकी होती. भूकंपाचा केंद्रबिंदू सुदूर पूर्वेकडील कामचटका द्वीपकल्पाचा किनारा होता. यामुळे कामचटका भागात शिवलुच ज्वालामुखीचा उद्रेक झाला. भूकंपाची तीव्रता ७ एवढी असल्याने अमेरिकेने त्सुनामीचा इशारा दिला आहे.

रशियातील ढ-डड वृत्तसंस्थेने रशियन अकादमी ऑफ सायन्सेसच्या सुदूर पूर्व शाखेच्या ज्वालामुखी आणि भूकंपविज्ञान संस्थेचा हवाला देऊन म्हटले आहे की, ज्वालामुखीने राख आणि लावा सोडण्यास सुरुवात केली होती. अहवालात शास्त्रज्ञांच्या हवाल्याने म्हटले आहे की, शिवलुच ज्वालामुखीचा उद्रेक सुरू झाला आहे, व्हिज्युअल मूल्यांकनानुसार राखेचा प्लम समुद्रसपाटीपासून आठ किलोमीटर उंच होत आहे.अमेरिकेच्या नॅशनल त्सुनामी वॉर्निंग सेंटरने भूकंपामुळे त्सुनामीचा धोका असल्याचे म्हटले होते. परंतु रशियाच्या आपत्कालीन मंत्रालयाच्या कामचटका शाखेने त्सुनामीचा धोका नसल्याचे सांगितले.

## जम्मू-काश्मीर : विद्यार्थिनींनी बनवल्या सैनिकांसाठी राख्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८जम्मू-काश्मीर १५**

भाऊ-बहिणीचा सण रक्षाबंधन हा सण दरवर्षी श्रावण महिन्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो. यंदा सोमवार (१९) ऑगस्ट २०२४ रोजी रक्षाबंधन सण साजरा होत आहे. दरम्यान उरी (जम्मू-काश्मीर) येथील विद्यार्थिनींनी



सैनिकांसाठी राख्या बनवल्या आहेत.

उद्या सोमवार (दि.१ ९) भाऊ-बहिणीचा सण रक्षाबंधन साजरा होणार आहे. दरम्यान जम्मू-काश्मीर मधील उरी येथील विद्यार्थिनी इकरा मुनीर म्हणते, आम्ही गेल्या दोन दिवसांपासून आपल्या देशाचे रक्षण करणाऱ्या भारतीय सैन्याच्या सैनिकांसाठी राख्या विणत आहोत. तर प्रशिक्षक वसीम पट्टण म्हणतात, गेल्या दोन दिवसांपासून मुलींनी २०० हून अधिक राख्या नेसल्या आहेत. रक्षाबंधनाच्या निमित्ताने या राख्या आमच्या सैनिकांना बांधल्या जातील जेणेकरून त्यांना त्यांच्या बहिणींपासून दूर आहोत असे वाटू नये.

## महायुतीत अनागोंदी? पुण्यात अजित पवारांना भाजपा कार्यकर्त्यांनी दाखवले काळे झेंडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८पुणे**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित पवार गटाने आज (रविवार, १८ ऑगस्ट) जुन्नरमधील नारायणगावात जनसन्मान यात्रेचं आयोजन केलं होतं. मात्र या कार्यक्रमासाठी नारायणगावात येणाऱ्या अजित पवारांना भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काळे झेंडे दाखवले. भाजपा कार्यकर्ते काळे झेंडे घेऊन रस्त्याकडेला उभे होते. त्यांनी अजित पवारांच्या ताफ्याला हे झेंडे दाखवून निषेध नोंदवला. तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी निदर्शने केली. भाजपाच्या या विरोधामुळे महायुतीत वाद पेटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर भाजपा कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी अजित पवारांविरोधात केलेल्या निदर्शनांमुळे अजित पवार गटातील नेते देखील आक्रमक झाले आहेत. अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी यावरून नाराजी व्यक्त केली आहे.

सुनील तटकरे म्हणाले, आम्ही भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी याविषयी बोलणार आहोत. तर याबाबत देवेंद्र फडणवीस यांनी खुलासा करावा अशी मागणी अजित पवार गटातील विधान परिषदेचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे.दरम्यान, निदर्शने करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनी सांगितलं की येथे शासकीय बैठक बोलावली आहे. मात्र, कार्यक्रमाच्या ठिकाणी कुठेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा फोटो नाही. ते (अजित पवार) पुण्याचे पालकमंत्री असतील तर त्यांनी या जिल्ह्याचं पालकत्त्व घ्यायला हवं. ते करण्याऐवजी ते त्यांचं वैयक्तिक राजकारण करत आहेत. तसेच भाजपा कार्यकर्त्यांनी यावेळी स्थानिक आमदार अतुल बेनके यांच्याविरोधातही घोषणाबाजी केली.

## मराठ्यांनी देश चालवायचा, आरक्षण का मागावं? संभाजी भिडे यांचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ सांगली**

बांगलादेशमध्ये हिंदू वर होणाऱ्या अत्याचाराविरोधात श्री शिवप्रतिष्ठान सांगली जिल्ह्यात २५ ऑगस्ट रोजी कडकडीत बंद पाळला जाणार आहे. बांगलादेशमधील नंगानाच तात्काळ थांबायला हवा यासाठी केंद्राने पुढाकार घ्यावा अशी प्रतिक्रियाही शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संभाजी भिडे यांनी दिलीय. तसंच मराठ्यांनी आरक्षण मागावे का? असा सवाल संभाजी भिडे यांनी उपस्थित केलाय. तसंच मराठा आरक्षण हा कळीचा मुद्दा आहे, मराठ्यांनी उभा देश चालवायचा आहे, आरक्षण कुठून काढलंय, असंही भिडे म्हणालेत. ते सांगलीत माध्यमांशी बोलत होते.




मराठ्यांनी आरक्षण मागावे का? असा सवाल संभाजी भिडे यांनी उपस्थित केला आहे. मराठा आरक्षण हा कळीचा मुद्दा आहे, पण मराठ्यांनी आरक्षण मागावे का? मराठ्यांनी उभा देश चालवायचा आहे, आरक्षण कुठले काढले. मराठा जात संपूर्ण देशाचा संसार चालवणारी जात आहे. हे ज्यावेळी मराठ्यांच्या लक्षात येईल त्या दिवशी या मातृभूमीचं भाग्य उजळून जाईल. मात्र हे मराठ्यांच्या लक्षात येत नाही हे दुर्दैव आहे, असे संभाजी भिडे म्हणाले.

रामगिरी महाराज यांच्या वक्तव्याबबाबत संभाजी भिडे म्हणाले, मुख्यमंत्री यांची जी भूमिका आहे तीच आमची आमची भूमिका आहे. उद्धव ठाकरे आज काही गोष्टीवर बोलत नाहीत. देशात बलात्कार प्रकार हा किळसवाणा झालाय, हा अत्याचार थांबायला हवेत. कोणत्याही स्त्रीवरचा बलात्कार म्हणजे मातेवर बलात्कार आहे, असे संभाजी भिडे म्हणाले.

पाकिस्तानचा अविभाज्य भाग म्हणून बांगलादेशचा जन्म झाला. त्या बांगलादेशच्या पंतप्रधान आज हिंदूस्थानकडे आश्रयाला आल्या, दुसरीकडे कुठे गेल्या नाहीत. पंतप्रधान भारतात आल्यावर बांगलादेश मध्ये प्रतिक्रिया उमटल्या . हिंदूंवर अत्याचार होतोय, बांगलादेशमध्ये सुरू असलेला अत्याचार तात्काळ थांबला पाहिजे. हिंदूस्थानमध्ये याची संतप्त प्रतिक्रिया उमटत नाही. बांगलादेशमध्ये हिंदूवर होणाऱ्या अत्याचारा विरोधात श्री शिवप्रतिष्ठान सांगली जिल्ह्यात २५ ऑगस्ट रोजी कडकडीत बंद पाळला जाणार आहे. बांगलादेशमधील नंगानाच तात्काळ थांबायला हवा यासाठी केंद्राने पुढाकार घ्यावा. बांगलादेशमधील हिंदू लोकांचे अजिबात स्थलांतरन नको ,त्याना बांगलादेश मधेच सुरक्षा मिळायली हवी. सगळ्या हिंदू राजकारण लोकांनी या गोष्टी घडल्यावर पेठून उठायला हवे, असे संभाजी भिडे म्हणाले.

## अकोल्यात लसणाच्या नावाखाली विकतात सिमेंटच्या पाकळ्या!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अकोला**

लसणाची फोडणी दिल्याशिवाय जेवणाला चव येत नाही. पण हीच फोडणी अकोल्यातल्या एका कुटुंबाला चांगलीच महागात पडली असती. लसणाच्या जागी त्यांना सिमेंटचा गोळा फेरीवाल्याने विकला.अकोल्यात सिमेंटचा वापर करत बनवल्या लसणाच्या गाठी बनवल्याचा प्रकार समोर आलाय. आर्टिफिशियल पद्धतीने सिमेंटचा वापर करत लसूणच्या गाठी बनवल्यात. हा लसूण सोलत असताना पाकळ्या वेगळ्या होत नव्हत्या. त्यामुळे सदर लसूणच्या गाठीला चाकूच्या सहाय्याने कापले




असता सिमेंटपासून तयार केलेल्या लसूणासारखी बनवलेला लसूण असल्याचे समोर आलंय. यावर पांढऱ्या रंगाचा वापर सुद्धा करण्यात आला आहे. फेरीवाल्यांकडून बनावट लसूणची विक्री होत असल्याचं समोर आलंय.

अकोल्यात लसणाचा (लसूण) काळाबाजार करणाऱ्यांनी अजबगजब शक्कल लढवत नागरिकांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आलाय. अकोला शहरातील बहुतांश भागात फेरीवाले रोज भाजीपाला विक्रीसाठी येत असतात यातीलच काही फेरीवाल्यांकडे डुप्लिकेट लसूण विक्री करत असल्याचे दिसून येत आहे. अकोल्यातल्या बाजोरिया नगर परिसरात राहणाऱ्या पोलीस विभागातून सेवानिवृत्त झालेल्या सुभाष पाटील यांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

सुधाकर पाटील यांच्या पत्नी यांनी त्यांच्या घरासमोर आलेल्या फेरीवाल्याकडून लसूण विकत घेतले. यात काही हुबेहूब ओरिजनल लसूणा सारखी आर्टिफिशियल पद्धतीने सिमेंटचा वापर करून बनवलेल्या लसणाच्या पाकळ्या असल्याचे दिसून आल्या. लसूण सोलत असताना हा पाकळ्या वेगळ्या होत नव्हत्या त्यामुळे सदर लसणाच्या गाठीला चाकूच्या सहाय्याने कापले असता सिमेंट पासून तयार केलेल्या लसणासारखी बनवलेला लसून असल्याचे समोर आले. यावर पांढऱ्या रंगाचा वापर सुद्धा करण्यात आला आहे.

भाजीची फोडणी असो किंवा वरणाची त्यात लसूण हा आलाच आहे. पण हाच लसूण तुमच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरु शकतो. लसणासारखाच दिसत असला तरी हा लसूण नाही तर हा आहे सिमेंटचा दगड आहे. जो अकोल्यात सर्रासपणे लसूण म्हणून विकला जातोय. अकोला शहरात फेरीवाल्यांकडून ही फसवणूक केली जाते. कधी मीठ, साखरेत प्लास्टिकचे तुकडे आढळतात. तर कधी तांदळामध्ये प्लास्टिकचा तांदुळ मिसळून जिवाशी खेळ केला जातोय. त्यामुळे अशा बोगस विक्रेत्यांपासून सावध राहा आणि आरोग्य जपा..

## लाखो राख्या घेऊन अमरावतीतून उमेदच्या महिला भगिनी मुंबईसाठी रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

राखीची भेट म्हणून मुख्यमंत्री यांनी उमेदच्या महिलांना न्याय द्यावा अशी मागणी करत अमरावती जिल्ह्यातून मोठ्या संख्येत महिला भगिनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राखी बांधण्यासाठी रविवारी १८ ऑगस्ट रोजी रवाना झाल्या.उमेद विभाग कायम करा, सर्व कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत



कायम करा, महिला केडरला आशा व अंगणवाडी सेविकेचा दर्जा देण्यात यावा, या प्रमुख मागण्या घेऊन उमेद कल्याणकारी कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वात महिला मुंबईसाठी रवाना झाल्या आहेत.महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत कार्य करणाऱ्या सर्व महिला यांच्यातर्फे बनवण्यात येणाऱ्या एक लक्ष राख्या घेऊन मुख्यमंत्री यांच्या वर्षा बंगला वरती त्यांना भेट म्हणून दिल्या जाणार आहेत. मुख्यमंत्र्यांनी वेळोवेळी महिला सक्षमीकरणासाठी वेगवेगळ्या योजना आणल्या आहेत. त्या योजनांसाठी त्यांचे स्वागतच आहे. परंतु अजूनही उमेद संघटनेची रास्त मागणी मुख्यमंत्र्यांनी मान्य केली नाही किंवा त्याची घोषणा केली नाही, असे यावेळी सांगण्यात आले. या रक्षाबंधनाच्या पर्वावर मुख्यमंत्री महोदयांनी आमचा उमेद समूहातील सर्वांना सेवेत कायम करून त्याना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्यावा, जेकॅडर आहेत त्या सर्व कॅडर यांना आशा वर्कर आणि अंगणवाडी सेविका यांच्याप्रमाणे दर्जा देऊन त्यांच्या मानधनात वाढ करावी ही एकमेव आमची आहे. ही मागणी घेऊन आज आम्ही आमच्या स्वखर्चाने राख्या घेऊन जात आहोत. तरी मुख्यमंत्री यांनी आमची मागणी मान्य करावी अशी विनंती यावेळी करण्यात आली.

## यंदा रक्षाबंधनाला नसणार भद्राचं सावट; जाणून घ्या राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अमरावती**

रक्षाबंधनाचा सण बघता बघता उद्या म्हणजेच १९ ऑगस्ट रोजी साजरा केला जाणार आहे. हा पवित्र पर्व श्रावण शुक्ल पौर्णिमेला साजरा केला जाणार आहे. या दिवशी बहीण भावाच्या मनगटावर राखी बांधते. या दिवशी बहिणी भावाच्या मनगटावर राखी बांधतात आणि भाऊ त्यांच्या रक्षणाच्या वचनासोबत काही खास भेटवस्तू देतात.

राखीच्या धाग्याला रक्षासूत्र असं म्हटलं जातं. राजसूय यज्ञाच्या वेळी भगवान कृष्णाला द्रोपदीने रक्षासूत्र म्हणून पदराची चिंधी बांधली होती. तेव्हापासून ही परंपरा सुरु झाली, असं सांगण्यात येतं. यंदाच्या रक्षाबंधनाला भद्रा काळ असल्या कारणाने अनेक लोक चिंतेत आहेत. त्यामुळे भद्राकाळात भावाला राखी कधी आणि केव्हा बांधावी हा बहिणींना प्रश्न पडला आहे. यासाठीच, ज्योतिष शास्त्रानुसार, असं सांगण्यात आलं आहे की यंदा रक्षाबंधनाच्या दिवशी भद्राकाळ आहे पण त्याचा पृथ्वीवर कोणताच परिणाम होणार नाही.

**'हा' आहे शुभ मुहूर्त**

ज्योतिष शास्त्रानुसार, रक्षाबंधन श्रावण शुक्ल पौर्णिमेच्या दिवशी साजरा केला जाणार आहे. यंदा पौर्णिमा १९ ऑगस्ट रोजी रात्री ११.५५ मिनिटांपर्यंत असणार आहे. १९ ऑगस्ट रोजी भद्राकाळ दुपारी




०१.३३ पर्यंत असणार आहे. पण, चंद्राचं स्थान मकर राशीत असल्या कारणाने भद्राकाळ पाताळमध्ये असणार आहे. त्यामुळे धरतीवर कोणत्याच प्रकारे भद्राकाळचा प्रभाव नसणार आहे. त्यामुळे बहिणी अगदी कोणताही मनात संकोच न ठेवता भावाला राखी बांधू शकतात. फक्त राहुकाळात राखी बांधू नये.

**रक्षाबंधनाला केव्हा असणार राहुकाळ**

रक्षाबंधनाच्या दिवशी राहुकाळसुद्धा लागणार आहे. या दिवशी सकाळी ७ वाजून ३१ मिनिटांपासून ते सकाळी ९ वाजून ८ मिनिटांपर्यंत राहु काळ असणार आहे. त्यामुळे काळात चुकूनही राखी बांधू नये.

**राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त**

राखी बांधण्याचा शुभ मुहूर्त दुपारी ०१.४६ पासून ते संध्याकाळी ०४.१९ पर्यंत असणार आहे. याचाच अर्थ राखी बांधण्यासाठी २ तास ३३ मिनिटांचा काळ असणार आहे. याशिवाय, तुम्ही संध्याकाळी प्रदोष काळातसुद्धा भावाला राखी बांधू शकता.या दविशी संध्याकाळी ०६.५६ ते रात्री ०९.०७ वाजेपर्यंत प्रदोष काळ असणार आहे.

## तब्बल दिड लाख राख्या पाठविणारी ताई....
## माजी मंत्री अॅड. यशोमती ठाकूर यांच्याकडून साजरे होते दरवर्षी अनोखे रक्षाबंधन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८ अमरावती**

रक्षाबंधन दिवशी आपल्या अमरावती जिल्ह्यासह ठिकठिकाणी तब्बल दिड लाख राख्या पाठवून काँग्रेसच्या नेत्या, आमदार तथा माजी मंत्री ड. यशोमती ठाकूर यांच्याकडून दरवर्षी अनोखे रक्षाबंधन साजरे होते. ड. यशोमती ठाकूर यांनी हा अनोखा उपक्रम सुरू करीत नात्यांमधील गोडवा जपण्याचे काम केले आहे. त्यामुळे रक्षाबंधन दारम्यांन ड. यशोमती ठाकूर यांची ओळख तब्बल दिड लाख राख्या पाठविणारी ताई अशी बनली आहे.

रक्षाबंधन हा भाऊ आणि बहिणीमधील प्रेम आणि विश्वासाचा सण आहे. या दिवशी बहिणी आपल्या भावाच्या दीर्घायुष्यासाठी आणि त्याच्या आयुष्यात आनंदासाठी प्रार्थना करतात. मात्र ज्यांना बहीण नाही अशा अनेक मंडळींना ड. यशोमती ठाकूर यांच्याकडून तब्बल दिड लाख राख्या खरेदी



करून त्या ३३८ गावाममध्ये पाठविल्या जातात. विशेष म्हणजे या उपक्रमात राख्यांची ही संख्या दरवर्षी वाढत जात असल्याचे ड. यशोमती ठाकूर यांनी सांगितले. यावर्षी ही ड. यशोमती ठाकूर यांनी ही परंपरा कायम ठेवत तब्बल दिड लाख राख्या खरेदी केल्या आहेत.

संपादकीय ......

# कोलकात्यातील ‘अभया’

देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त दिल्लीतील लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात पंतप्रधान नरेंद मोदी यांनी दलित, शोषित, वंचित, गरीब व आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी एनडीए-३.० सरकार कटिबद्ध असल्याचा उल्लेख केला. तसेच आपल्या माता, बहिणी आणि मुलींवर जे अत्याचार होत आहेत, त्याबद्दल जनतेत संताप आहे. अत्याचाराच्या गुन्ह्यांचा तपास लवकरात लवकर लागून, गुन्हेगारांना अत्यंत कडक शिक्षा झाली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले; मात्र त्याचवेळी उत्तराखंडात रुग्णालयातून घरी परतणार्या परिचारिकेची बलात्कार करून हत्या झाल्याची घटना घडली आहे. दुसरीकडे, कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार व हत्येवरून गेल्या आठवडाभर देशात रोष निर्माण झाला आहे. आरजी कर वैद्यकीय महाविद्यालयात ही घटना घडली असून, दोन दिवसांपूर्वी आंदोलक असल्याचे भासवून, चाळीसजणांच्या टोळक्याने रुग्णालयात प्रवेश करून नासधूस केली. याखेरीज ९ ऑगस्टपासून जेथे प्रशिक्षणार्थी डॉक्टर आंदोलन करत आहेत, ते व्यासपीठ तोडले. त्याबरोबर राज्य सरकारला परिस्थिती नियंत्रणात आणता येत नसेल, तर लष्कर तैनात करा, अशी मागणी भाजप प्रदेशाध्यक्ष सुकांता मुजुमदार यांनी केली. उलट आमचे मनोधैर्य खच्ची व्हावे म्हणून हा हिंसाचार करण्यात आल्याचा आरोप डॉक्टरांनी केला आहे, तर या हल्ल्यामागे विरोधकांचा हात असल्याचा आरोप पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला आहे.

आता केवळ सरकारी रुग्णालयांतील डॉक्टर्सच नव्हे, तर परिचारिकांनाही संरक्षण देण्याची मागणी केली जात आहे. कोलकात्यातील ही घटना इतकी क्रूर आणि धक्कादायक होती की, त्यामुळे देशभरातील केवळ डॉक्टरच नव्हे, तर सामान्य जनता खवळून उठली असून, हे स्वाभाविकच म्हणावे लागेल. आरोपी संजय रॉय हा अत्यंत विकृत व निर्दयी आहे. आरोपीने इतके भयंकर कृत्य केले आहे की, त्याला लवकरात लवकर फाशी दिली जावी, ही जनभावना आहे; परंतु लोकशाहीत जनभावनेनुसार न्याय होत नाही, तर पोलिसांनी तपास त्वरेने करून पुरावे गोळा करावे लागतात. साक्षीदार उभे करून त्यांना संरक्षणही पुरवावे लागते आणि वेळेवर आरोपपत्र देऊन उत्तम वकिलांकरवी समर्पक युक्तिवाद करावा लागतो. ही घटना घडून पाच दिवस झाल्यानंतरदेखील पोलिसांना तपासात लक्षणीय प्रगती करता आलेली नाही, असे निरीक्षण नोंदवून कोलकाता उच्च न्यायालयाने तपास सीबीआयकडे सोपवण्याचे आदेश दिले आणि सीबीआयने आपला तपासही सुरू केला आहे; मात्र त्याचवेळी राज्यातील निदर्शने करणार्या डॉक्टरांना काम बंद आंदोलन मागे घेण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले. सरकारी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणार्या रुग्णांवर उपचार करणे, हे डॉक्टरांचे पवित्र कर्तव्य असल्याचे खंडपीठाचे म्हणणे योग्यच आहे. महाराष्ट्रातही ‘मार्ड’ने गेल्या मंगळवारीच संप पुकारला होता. पेच असा आहे की, संप केल्याशिवाय सरकारी यंत्रणा हलत नाही आणि संप केला, तर रुग्णांची पंचाईत होते.

२०१२ मध्ये नवी दिल्लीत ‘निर्भया कांड’ घडले होते. त्यानंतर बलात्कारविरोधी कडक कायदा करण्यात आला, तरीही अत्याचार अजिबात थांबलेले नाहीत. मुंबईतील केईएम इस्पितळात १९७३ मध्ये अरुणा शानभाग प्रकरण झाले. कोलकात्याच्या या ‘अभया’ प्रकरणात तपास मार्गी लावा, नाही तर तो सीबीआयकडे सोपवू, असे खुद्द मुख्यमंत्री ममतादीदींवरच म्हणण्याची वेळ आली. याचा अर्थ, आपल्या पोलिस दलाच्या कार्यक्षमतेवर त्यांचाच विश्वास नव्हता. एरवी सीबीआयवर तोफ डागणार्या ममतादीदी यावेळी मात्र त्याच यंत्रणेकडे तपास सोपवण्यास राजी झाल्या; परंतु मुळात ममतादीदींनी या प्रकरणातील आपल्या सरकारच्या बेफिकीर व संशयास्पद भूमिकेबद्दल जनतेची माफी मागितली पाहिजे. ही ‘अभया’ जेव्हा महाविद्यालयात मरण पावल्याचे आढळले, तेव्हा ही आत्महत्या असल्याचा दावा महाविद्यालयाच्या प्रशासनाने केला. हे वृत्त कळताच तिचे पालक जेव्हा धावतपळत महाविद्यालयात आले, तेव्हा मात्र त्यांना दोन तास बाहेरच ताटकळत ठेवण्यात आले. मुलीचा मृतदेह दाखवणेही टाळण्यात येत होते. ही आत्महत्याच असल्याचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप घोष यांचा दावा असताना प्रत्यक्षात तो बलात्कार व खून असल्याचे उघड झाले.

मुलींनी उच्च शिक्षण घ्यावे आणि पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून नोकरी-व्यवसाय करावा, अशी अपेक्षा केली जाते; परंतु शिक्षणाच्या वा कामाच्या ठिकाणी सुरक्षितता पुरवण्याची जबाबदारी कोणाची आहे? एखादे नृशंस कृत्य झाल्यानंतर आरोपीला फाशी द्या, त्याचा एन्काऊंटर करा अशा गर्जना केल्या जातात. मेणबत्ती घेऊन मोर्चे काढले जातात; परंतु मुळात गुन्हाच होऊ नये, याची काळजी घ्यायला हवी. संजय रॉय नावाच्या राक्षसावर अगोदरच पत्नींकडून अत्याचाराचे आरोप असताना तो मुळात पोलिसमित्र झालाच कसा? त्याला महाविद्यालयात प्रवेश मिळालाच कसा? या प्रकारच्या घटनांमुळे आपल्या मुलींना शाळा-कॉलेजात पाठवताना पालकांना काळजी वाटणारच; परंतु आपल्याकडे या प्रकारची घटना घडल्यानंतर त्याबाबत लगेच राजकारण सुरू होते. भाजपने पश्चिम बंगालमधील महिला अत्याचारावर लक्ष्य केंद्रित केल्यास विरोधी पक्ष हाथरस, ऊना, कथुआ इथल्या अत्याचाराच्या प्रकरणांकडे लक्ष वेधतो. स्त्रियांची अवहेलना आणि खून यावरून पक्षीय दृष्टिकोनातून राजकारण करणे, हीच अत्यंत शोचनीय बाब आहे.




## आंघोळीने लठ्ठपणा कमी होतो का?

**दि.१८ विदर्भ प्रजसत्ताक**

आंघोळ केल्याने वजन कमी होऊ शकते का हा प्रश्न अनेक लोकांच्या मनात येतो, विशेषतः जे वजन कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. आंघोळ केल्याने केवळ ताजेपणा आणि आराम मिळत नाही, तर लठ्ठपणा कमी करण्याचा हा एक मार्ग आहे का? प्रथम, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की लठ्ठपणा ही अनेक कारणांसह एक जटिल समस्या आहे.



खाण्याच्या सवयी, शारीरिक हालचालींचा अभाव आणि हार्मोनल असंतुलन यांसारख्या अनेक कारणांमुळे लठ्ठपणा वाढतो. तज्ज्ञ सांगतात की आंघोळीसाठी काही कॅलरीज खर्च होतात; पण ते प्रमाण खूपच कमी असते.एक सामान्य आंघोळ सुमारे १००-१५० कॅलरीज बर्न करते, जे आपल्या दैनंदिन कॅलरीच्या गरजेचा एक छोटासा भाग आहे, तर आंघोळीने लठ्ठपणा कमी होतो का? याचे साधे उत्तर... 'नाही'! आंघोळीने लठ्ठपणा कमी होत नाही. थोड्या कॅलरीज बर्न करण्याचा हा एक मार्ग आहे.तथापि, आंघोळ केल्याने आपल्याला निश्चितपणे इतर काही फायदे मिळू शकतात जे अप्रत्यक्षपणे लठ्ठपणा कमी करण्यास मदत करू शकतात. रोजच्या

**आंघोळीने हे लाभ होत असतात...**

तणाव कमी होतो: आंघोळ केल्याने तणाव कमी होतो, ज्यामुळे तुमच्या शरीरातील कोर्टिसोलची पातळी कमी होण्यास मदत होते. कोर्टिसोल हा एक हार्मोन आहे जो वजन वाढण्यास हातभार लावतो.

झोप सुधारतेः आंघोळ केल्याने झोप सुधारते, जे वजन कमी करण्यासाठी महत्त्वाचे आहे. झोपेच्या कमतरतेमुळे तुमचे चयापचय मंदावते, ज्यामुळे वजन वाढण्याची शक्यता वाढते.

शरीराचे डिटॉक्सिफिकेशनः आंघोळ केल्याने घामाद्वारे तुमच्या शरीरातील काही विषारी पदार्थ बाहेर पडतात, ज्यामुळे तुमचे शरीर निरोगी राहण्यास मदत होते. एकंदरीत, आंघोळ केल्याने लठ्ठपणा कमी होत नाही; परंतु ते वजन कमी करण्याच्या प्रयत्नात मदत करू शकते.

# महाराष्ट्र शासनाच्या वतीने शेतकऱ्यांना दिले जाणारे पुरस्कार कसे व्हाल सहभागी

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यात दरवर्षी शेती व संलग्न क्षेत्रात अति उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना अथवा संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या वतीने खालील राज्यात दरवर्षी शेती व संलग्न क्षेत्रात अति उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना अथवा संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या वतीने खालील पुरस्कार दिले जातात.

**१) डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार (संख्या १)**

**पुरस्कार सुरु वर्ष सन: २०००-२००१-** कृषी क्षेत्रातील कृषी विस्तार, कृषी प्रक्रीया, निर्यात, कृषी उत्पादन, पीक फेरबदल, कृषी उत्पादनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादीमध्ये अति उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यातील कोणत्याही एका शेतकऱ्यास अथवा संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत सन्मानित करण्यात येते.

रु. तीन लाख रोख रकमेचे पारितोषिक, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार.

सन २०१९ अखेर देण्यात आलेले एकूण पुरस्कार- २३

**२) वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार (संख्या ०८)**

**पुरस्कार सुरु वर्ष सन- १९८४-८५ -** कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विकास व फलोत्पादन, ग्रामीण विकास, ज्यामध्ये बायोगॅसचा वापर, शेतकऱ्यांचा विकास इत्यादी संलग्नक्षेत्रात अव्दितीय कार्य करणाऱ्यांना राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत दरवर्षी एकूण ०८ शेतकरी अथवा संस्थाना कृषीभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

रु. दोन लाख रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार.

सन २०१९ अखेर देण्यात आलेले एकूण पुरस्कार- २९२

**३) जिजामाता कृषीभूषण पुरस्कार (संख्या ०८)**

**पुरस्कार सुरु सन १९९५-** राज्यातील शेतीक्षेत्राची सातत्याने होत असलेली प्रगती व या प्रगतीत उत्पादन वाढीत महिलांचाही फार मोठा वाटा आहे व तो सातत्याने वाढत असू, शेती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि आर्थिक चळवळीत महिला सातत्याने पुढे येत आहेत. शेतीविकासाच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची बाब आहे. तसेच शेतीक्षेत्रातील महिलांचा वाढता सहभाग लक्षात घेऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव व्हावा व अशा महिलांच्या कार्याने प्रभावित होऊन इतर महिलांमध्ये जागृती निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत पुरस्काराची सुरुवात केली आहे.

रु. दोन लाख रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व पतीसह सत्कार.

सन २०१९ अखेर देण्यात आलेले एकूण पुरस्कार- १११

**४) कृषीभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार (संख्या ८)**

**पुरस्कार सुरु सन २००९-१०-** सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सेंद्रीय निविष्ठा वापरण्यात प्रोत्साहन देऊन शेती करणाऱ्या तसेच उत्पादीत सेंद्रीय मालाची विक्री व्यवस्था करणे या मुख्य हेतूने राज्यातील जे शेतकरी या संकल्पनेचा अवलंब करत आहेत, अशा शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते.

रु. दोन लाख रोख रक्कम, स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार.

सन २०१९ अखेर देण्यात आलेले एकूण पुरस्कार- ७८




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**५) वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार (संख्या ०८)**

**पुरस्कार सुरु सन - १९९४-** जे जाणते शेतकरी त्यांच्या कृषीज्ञानाचा फायदा त्यांच्या परिसरातील इतर शेतकऱ्यांना देतील आणि शेती उत्पादन वाढविण्यास शेतकऱ्यांना मार्गदर्शन किंवा प्रोत्साहित करतील, तसेच इतर व्यक्ती/संस्था ज्या स्वतः शेती करीत नाहीत किंवा ज्यांची स्वतःची शेती नाही. परंतु पत्रकारीतेव्दारे किंवा इतर अन्य मार्गाने या क्षेत्रात बहुमोल कामगिरी करतात अशा शेतकऱ्यांना/व्यक्तींना/संस्थांना, त्याचप्रमाणे कृषी क्षेत्राशी संलग्न घरगुती उद्योग (उदा. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मधुमक्षिकापालन, रेशीम उद्योग, गांडूळशेती इत्यादीमधील) वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या व्यक्ती तसेच खेड्यांमधून परसबाग वृध्दींगत करणाऱ्या महिला, कृषी विकास मंडळ ज्या गावात सक्रिय आहे. अशा शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते.

रु. एक लाख वीस हजार रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार.

सन २०१९ अखेर देण्यात आलेले एकूण पुरस्कार- ८१

**६) उद्यान पंडित पुरस्कार (संख्या ८)**

**पुरस्कार सुरू सन: २००१-०२-** महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती, जमिनीची प्रत व हवामानातील विविधता यामुळे फलोत्पादनास मोठा वाव आहे. भाजीपाला पिके, फळ पिके, फुल पिके, मसाला पिके, औषधी व सुंगधी वनस्पती पिके यापासून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात लाभ होत आहे. तसेच राज्यात फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या पुरस्काराने शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते.

रु. एक लाख रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार.

सन २०१९ अखेर देण्यात आलेले एकूण पुरस्कार- २२३

**७) वसंतराव नाईक शेतिनिष्ठ शेतकरी पुरस्कार (संख्या ४०)**

**पुरस्कार सुरू सन : १९६७-** शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान शेतीमध्ये सुधारीत शेती अवजारांचा वापर, जमिनीच्या प्रतवारी प्रमाणे पिकांची लागवड, जमिनीचे सपाटीकरण, कंटुर पध्दतीने पेरणी, रासायनिक खतांचा सुयोग्य वापर, विहीर/नाला इत्यादी मधील पाणी अडवून शेतीतील नालाबडींग इत्यादीद्वारे तसेच तुषार व ठिबक सिंचन पध्दतीद्वारे पाण्याचा सुयोग्य वापर, पीक संरक्षक औषधांची वेळेवर फवारणी, शेतीपुरक व्यवसाय, हलक्या व कोरडवाहू जमिनीत फळझाड लागवड करणे, स्वतःच्या कल्पनेने नवनवीन पध्दतीने पीक लागवड, शेतकऱ्यांना शेती मशागतीचा उपयोग करण्यास मार्गदर्शन करणे, राज्य शासनाच्या कृषी विभागाकडून आदिवासी गटासह एकूण ४० (चाळीस) शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात येते.

रु. ४४०००/- रोख रक्कम, पारितोषिक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार.

सन २०१९ अखेर देण्यात आलेले एकूण पुरस्कार- १४७१

**८) पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, कृषी सेवारत्न पुरस्कार (संख्या १०)**

**पुरस्कार सुरू सन २०१४-** राज्यातील शेतीविषयक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने महत्वाचे व मोलाचे कार्य करणाऱ्या विभागातील सर्व संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील एका अतिउत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यास राज्यशासनाव्दारे सन्मानित करण्यात येते.

सन २०१९ अखेर देण्यात आलेले एकूण पुरस्कार - १३

**९) युवा शेतकरी पुरस्कार (संख्या० ८)**

**पुरस्कार सुरू सन: २०२०**

वय वर्ष १८ ते ४०

रु. एक लाख वीस हजार रोख रक्कम, पारितोषिक, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व सपत्नीक सत्कार.

इच्छुक शेतकऱ्यांनी पुरस्काराचे प्रस्ताव सादर करण्यासाठी नजिकच्या तालुका कृषी कार्यालयास संपर्क साधावा.



## ईकेवायसी करण्यासाठी महिला खातेदारांच्या बँकेसमोर रांगा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती-** बचत खात्याला ईकेवायसी करण्यासाठी तसेच आधार अपडेट करण्यासाठी अमरावतीत खातेदार महिलांनी स्टेट बँकेसह राष्ट्रीयकृत बँकांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे यावेळी गर्दी होऊन वाद उपस्थित होऊन नये यासाठी बँक प्रशासनाच्या वतीने महिलांना नंबर प्रमाणे कूपन देऊन शिस्त लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मागील काही दिवसांपासून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरण्यात येत आहे सदर फॉर्म भरताना महिलांनी त्यांचे राष्ट्रीयकृत बँकेचे खाते नंबर दिले आहे शहरात राष्ट्रीयकृत बँकांची कमतरता असल्याने बहुतांश महिलांनी स्टेट बँकेचे खाते नंबर दिलेले आहे फॉर्म भरलेल्या महिलांच्या खात्यांमध्ये रक्षाबंधन पूर्वी जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांची रक्कम तीन हजार रुपये जमा करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते त्यानुसार मागील दोन-तीन दिवसांपासून काही महिलांच्या खात्यांमध्ये लाडक्या बहीण योजनेचे तीन हजार रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे परंतु महिलांनी राष्ट्रीयकृत बँकेचे जे खाते दिलेले आहे त्या खात्यांमध्ये मागील बऱ्याच वर्षांपासून व्यवहार झालेले नाही त्यामुळे त्यांचे खाते इन ऍक्टिव्ह झाले आहे त्या खात्यांमध्ये व्यवहार सुरळीत करण्यासाठी ईकेवायसी करणे आवश्यक आहे त्यानंतर खात्यांमधून व्यवहार करता येईल त्यामुळे खात्यांना ईकेवायसी करण्यासाठी महिलांनी १६ ऑगस्ट रोजी येथील स्टेट बँकेत एकच गर्दी केली आहे बँकेत मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने तसेच खातेदार क्रमवारी लाईन मध्ये उभे राहत नसल्याने वाद उपस्थित होत आहे म्हणून बँक प्रशासनाच्या वतीने सर्व खातेदारांना क्रमवारी लाइन मध्ये उभे करून सर्वांना कूपन वाटप करण्यात आले आहे आणी त्या कुपनानुसार खात्यांना ईकेवायसी करण्यात येत आहे मोठ्या प्रमाणात महिला खातेदार आल्याने बँकेत जागा अपुरी पडत आहे त्यामुळे शेकडो महिला खातेदार स्टेट बँकेसमोर रांगा लावून उभे असल्याचे दिसून येत आहे.

# १२ वी ते पदवीधरांना सरकारी नोकरीची संधी!

## नवी मुंबई महानगरपालिकेत १९४ जागांसाठी भरती; अर्ज करण्यापूर्वी जाणून घ्या तपशील

**दि.१८ विदर्भ प्रजसत्ताक**

सरकारी नोकरीच्या शोधात असणाऱ्या पदवीधर आणि इयत्ता १२ वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या उमेदवारांसाठी एक सुवर्ण संधी चालू आली आहे. कारण मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेत १९४ रिक्त जागांसाठी भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. शिकाऊ पदासाठी ही भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यासाठी पदानुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख २० ऑगस्ट २०२४ आहे. मात्र अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी पदभरतीसाठीची शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, वेतन अन् परीक्षा शुल्क याबद्दल जाणून घ्या.

रिक्त पदसंख्या : १९४ (NMMC CMYKPY Bharti 2024)

पदाचे नाव

शिकाऊ

शैक्षणिक पात्रता

या भरतीचा अर्ज करण्यासाठी उमेदवार १२ वी/ खढख/ उत्तीर्ण/ डिप्लोमा/ पदवीधर/ पदव्युत्तर पदवी असणे आवश्यक आहे.

**वयोमार्यादा**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या भरतीसाठी उमेदवाराचे किमान वय १८ ते कमाल ३५ वर्षांपर्यंत असणे आवश्यत आहे, याच वयोगटातील उमेदवार भरतीसाठी अर्ज करू शकतात.

**अर्ज शुल्क**

या भरतीसाठी कोणतेही अर्ज शुल्क नाही.

नोकरी ठिकाण

नवी मुंबई



वेतन श्रेणी

भरतीप्रक्रियेतून निवड झालेल्या उमेदवारांना शैक्षणिक पात्रतेनुसार पगार दिला जाणार आहे. म्हणजे १२ वी पास उमेदवारास दरमहा ६ हजार रुपये, आयटीआय/पदविका उमेदवारास ८ हजार रुपये आणि पदवीधर/ पदव्युत्तर उमेदवारास प्रति महिना १० हजार रुपये विद्यावेतन दिले जाणार आहे.

**अर्ज करण्याची शेवटची तारीख-** २० ऑगस्ट २०२४ ही करण्याची शेवटची तारीख आहे. त्यामुळे उमेदवारांनी लवकरात लवकर अर्ज करा.

**शिबिराची तारीख आणि ठिकाण-** नवी मुंबई महानगरपालिका(मुख्यालय) भूखंड क्र.१, सेक्टर १५ ओ, सी.बी.डी बेलापूर नवी मुंबई हे शिबिराचे ठिकाण आहे. २० ऑगस्ट २०२४ रोजी हे शिबिर आयोजित केले आहे. निवड झालेल्या उमेदवारांना सर्व कागदपत्रांसह तिथे उपस्थित राहायचे आहे.

**भरतीसंदर्भातील अधिकृत जाहिरात**

https://drive.google.com

अर्ज भरण्याची लिंक

https://rojgar.mahaswayam.gov.in

**अधिकृत वेबसाइट**

www.nmmc.gov.in/navimumbai/

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

रविवार दि. १८ ऑगस्ट २०२४ शहर/ग्रामिण

# ८०० शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी ५० हजाराचे अनुदान!

## प्रोत्साहन अनुदान : आधार लिंक, ई-केवायसी करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती** - शासनाद्वारा नियमित शेतकरी खातेदारांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्यात आले. यामध्ये ७७९ शेतकऱ्यांचे अनुदान काही कारणांनी रखडले होते. या खातेदारांना आता व्हीके नंबर प्राप्त होत आहेत. त्यांनी बँक खाते आधार लिंकिंग केल्यानंतर त्यांना शासन अनुदानाचा लाभ मिळणार आहे.महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमक्ती योजनेंतर्गत १,३३,९७४ शेतकऱ्यांची यादी पोर्टलवर अपलोड करण्यात आली होती. यापैकी १,२३,१५६ खात्यांना कर्जमाफीसाठी विशिष्ट क्रमांक प्राप्त झालेला आहे.



यामध्ये १,२०,९०३ खात्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले आहे. त्यापैकी १,१९,१८१ शेतकऱ्यांना ८५७.१९ कोटींचा लाभ देण्यात आलेला आहे.कर्जदार शेतकऱ्यांची कर्जमाफी परंतु नियमित कर्ज भरणाऱ्यांना योजनेत डावलल्यामुळे शेतकरी नाराज झाले होते. अशा शेतकऱ्यांना ५० हजारापर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची घोषणा शासनाद्वारा करण्यात आली व तीनपैकी दोन वर्ष मुदतीत कर्ज भरणा करणाऱ्या १७,८४२ नियमित शेतकऱ्यांना आतापर्यंत ८१.२५ कोटींचा लाभ देण्यात आलेला आहे. यामध्ये ७७९ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण राहिले होते.

### बँक खात्याचे लिंकिंग ७ सप्टेंबर डेडलाइन

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत नियमित खातेदारांना प्रोत्साहन अनुदानाचा लाभ दिला जातो. या लाभासाठी पात्र ठरलेल्या; परंतु आधार प्रमाणीकरण न केलेल्या शेतकऱ्यांनी ७ सप्टेंबरपूर्वी ही प्रक्रिया करावी. या कालावधीत व्ही. के. नंबरप्राप्त शेतकऱ्यांनी सेतू केंद्रांवर जाऊन बँक खात्याचे आधार लिंकिंग करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी केले आहे.

### प्रोत्साहन अनुदानाची जिल्हास्थिती

| | |
|---|---|
| पोर्टलवर अपलोड खाते | - ३२,६३१ |
| योजनेत अपात्र खातेदार | - ८,१५६ |
| विशिष्ट क्रमांक प्राप्त | - १८,९१८ |
| आधार, ई-केवायसी पेंडिंग | - ७७९ |
| लाभ मिळालेली खाती | - १७,८४२ |
| मिळालेला लाभ (कोटी) | - ८१.२५ |

# उद्याला खगोलप्रेमींसाठी 'सुपर ब्लू मून' पाहण्याची पर्वणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती**

१९ ऑगस्ट रोजी संपूर्ण देशभर रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा केला जाईल. योगायोगाने याच दिवशी आकाशातील चंद्रही सर्वांत मोठा आणि अधिक तेजस्वी दिसणार आहे. यालाच 'सुपर ब्लू मून' असे म्हटले जाते. याला स्टर्जन मून असेही म्हटले जाते. आकाशात चंद्राचे हे मनोहारी रूप पाहणे म्हणजे सर्वांसाठी अनोखी पर्वणी ठरणार आहे.

चंद्राची पृथ्वीभोवतीची भ्रमण कक्षा लंबवर्तुळाकार असल्याने पृथ्वी व चंद्र अंतर कमी-अधिक होत असते. नेहमी हे अंतर सरासरी ३ लाख ८५ हजार किलोमीटर असते. या श्रावणी पौर्णिमेला चंद्र मकर राशीतील श्रवण या नक्षत्राजवळ रात्रभर पाहता येईल.



### किती वाजता पाहता येणार?

१९ ऑगस्टला रक्षाबंधनाच्या दिवशी संध्याकाळी ६:५६ वाजता चंद्रोदय होईल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी चंद्रास्त होईल.रात्री ११:५५ वाजता चंद्र सर्वांत मोठा आणि तेजस्वी दिसणार आहे. त्या त्या ठिकाणचे हवामान आणि दृश्यमानता यानुसार खगोलप्रेमींना चंद्राचे 'सुपर ब्लू मून' हे रूप पाहता येईल.

'ब्लू मून'ही एक खगोलीय घटना आहे. जेव्हा एकाच महिन्यात दोन पौर्णिमा असतात तेव्हा दुसऱ्या पौर्णिमेला किंवा एका हंगामात चार पौर्णिमा असतात तेव्हा तिसऱ्या पौर्णिमेला 'ब्लू मून' असे म्हणतात. जेव्हा चंद्र त्याच्या कक्षेत पृथ्वीच्या सर्वांत जवळ असतो तेव्हा त्याला 'सुपरमून' म्हणतात. या स्थितीत चंद्र सामान्य पौर्णिमेच्या चंद्रापेक्षा १४ टक्के मोठा आणि ३० टक्के अधिक तेजस्वी दिसतो.

# विदर्भात आठवडाभर जोरदार पावसाची शक्यता!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती** - राज्यातील बहुतेक भागात पावसाचा जोर कमी असल्याने व तापमान वाढल्याने पिकांना ओढ लागण्याची भीती असताना विदर्भात मात्र पुढचा आठवडाभर म्हणजे २५ ऑगस्टपर्यंत जोरदार पावसाची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

ऑगस्टच्या पहिल्या पंधरवाड्यात शांतता बाळगल्यानंतर विदर्भात १५ ऑगस्टपासून पावसाची सक्रियता पुन्हा वाढली आहे. काही वेळाच्या अंतराने हलक्या सरींचा वर्षाव होत आहे. अमरावती जिल्ह्यात दिवसभर आकाश पावसाळी ढगांनी व्यापले होते. अमरावती सह बहुतेक सर्व जिल्ह्यात पावसाळी वातावरण तयार झाल्याचे चित्र आहे.

पावसाळी जोर कमी झाल्याने दिवसाचे तापमान वाढले होते व ढगांच्या उपस्थितीमुळे उकाडा वाढल्याचे जाणवत होते. मात्र दोन दिवसांपासून पावसाळी



ढगांमुळे तापमान सरासरीच्या खाली आले असून उकाडा काहीसा कमी झाल्याचे जाणवत आहे.

# राज्यातील खड्डेमुक्तीसाठी ३१ ऑगस्टपर्यंतची डेडलाइनच

## दर सोमवारी अहवाल सादर करा, मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८मुंबई** - काही दिवसांवर आलेला गणेशोत्सव आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रस्ते आणि पुलांवरील खड्ड्यांमुळे सरकारची प्रतिमा मलीन होत



आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. कोणतीही सबब न सांगता मुंबईसह राज्यातील रस्ते आणि पूल येत्या ३१ ऑगस्टपर्यंत खड्डेमुक्त करा, तसेच खड्डेमुक्त केलेल्या रस्त्यांचे आणि पुलांचे फोटोसहित अहवाल दर सोमवारी सरकारला सादर करा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

कामात हलगर्जीपणा आणि दिरंगाई केल्यास कारवाई करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

राज्यात यंदा जोरदार पाऊस झाल्याने बहुतांश रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. गणेशोत्सव अवघ्या पंधरा दिवसांवर आल्याने बाप्पाचे आगमन खड्डेमय रस्त्यातून होणार आहे.

मुंबईसह राज्यातील रस्ते खड्डेमुक्त करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी मागील आठवड्यात दिले होते; परंतु अद्याप पूल आणि रस्त्यांवरील खड्डे पूर्णपणे बुजवण्यात येत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे येत आहेत.

रस्त्यांवर खड्डे पडल्याने सरकार विरोधात लोकांमध्ये मोठा असंतोष निर्माण झाला आहे.

मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता यांनी प्रत्येक आठवड्यात दोन दिवस, तर कार्यकारी अभियंता यांनी आठवड्याच्या तीन दिवस रस्ते आणि पुलांची किमान दोनशे किलोमीटरपर्यंत पाहणी करावी.खड्डेमुक्त रस्ते आणि पूल कामाचा आढावा घेण्याची जबाबदारी संबंधित मुख्य अभियंत्यावर असणार आहे. राज्यातील बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्ते व राष्ट्रीय महामार्गांना या सूचना लागू राहतील, असेही या अध्यादेशात नमूद केले आहे.


### आदेशात काय?

३१ ऑगस्टपर्यंत खड्डे पूर्णत: बुजवले गेले पाहिजेत. खड्डे भरण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी. गणेशोत्सवापूर्वी राज्यभरातील सर्व क्षेत्रीय अभियंता आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांची अद्ययावत माहिती संकलित स्वरूपात जमा करावी. अतिवृष्टीमुळे झालेल्या रस्त्यांच्या पुलांचा आढावा घेऊन खड्डे व दुरुस्तीची कामे त्वरित हाती घ्यावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने गणेशोत्सव काळात रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत राहतील, याची काळजी घेऊन त्याचे नियोजन करावे.

# आदिवासी समाजाचे १२ हजार ५०० पदे विनाविलंब तात्काळ भरतीचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती** - राज्यातील आदिवासी समाजाच्या १२ हजार ५०० पदांच्या पदभरतीची कार्यवाही विनाविलंब तत्काळ करण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागाने सर्व मंत्रालयीन विभागातील अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिवांना दिले आहे. यासंदर्भात १३ ऑगस्ट २०२४ रोजी आदेश निर्गमित केले असून या आदेशावर उपसचिव र. अं. खडसे यांची स्वाक्षरी



आहे. आदिवासी बेरोजगार तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी 'लोकमत'ने रखडलेल्या या पदभरतीबाबतचा विषय सातत्याने प्रकाशित केला. परिणामी, आदिवासी समाजाचे आमदार, खासदारांसह शासनाला दखल घ्यावी लागली, हे विशेष.

> बेरोजगार आदिवासी उमेदवारांच्या रखडलेल्या १२ हजार ५०० पदांच्या भरतीसाठी सातत्याने सरकार आणि शासनाकडे दोन वर्षभरापासून पाठपुरावा करण्यात आला. यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची समर्थ साथ मिळाली. आता सामान्य प्रशासनाने निर्देश जारी केल्यामुळे आदिवासी युवकांना न्याय मिळणार आहे.
>
> **- डॉ. संदीप धुर्वे,** आमदार आर्णी-केळापूर

**पदभरतीसाठी विधिमंडळातील कार्यवाही एक नजर...**

२ मार्च २०२१ रोजी आमदार डॉ. संदीप धुर्वे यांनी ३१ क्रमांकावर तारांकित प्रश्न विचारला होता.

१० मार्च २०२२ रोजी सभागृहात आदिवासी भरतीबाबत आदिवासींचे नेते म्हणून बोलण्याची संधी.

पदभरतीसाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना २८ जून २०२४ रोजी निवेदन दिले होते.

# मंत्रालयात रॅकेट; कागदपत्रांत फ्रॉड, अमरावतीच्या डेप्युटी आरटीओची सेवा समाप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती** -मूळ जन्मप्रमाणपत्र, शाळा सोडल्याच्या दाखल्यासह अधिवास ठिकाण बदलवून सेवापुस्तकात खाडाखोड केल्याप्रकरणी अमरावतीचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राजकुमार वर्धेकर (बागडी) यांची राज्याच्या गृहविभागाने सेवा समाप्तीचा निर्णय घेतला आहे. किंबहुना कागदपत्रांत फ्रॉड असतानाही अधिकाऱ्यांना अतिरिक्त कर्तव्य सेवा आणि आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी मंत्रालयात रॅकेट असल्याचे आता स्पष्ट होत आहे.

राज्याच्या गृह विभागाचे अवर सचिव सुनील आपटे यांच्या स्वाक्षरीने १६ ऑगस्ट २०२४ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार डेप्युटी आरटीओ राजकुमार वर्धेकर (बागडी) यांची प्रथम नियुक्ती ही वर्धा येथे झाली होती. बागडी यांचा खरा जन्म २२ सप्टेंबर १९६४ असा आहे. मात्र, त्यांच्या उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गाच्या यादीत १ जानेवारी २०१८ ते १ जानेवारी २०२२ रोजीच्या सेवाज्येष्ठता यादीत जन्मतारीख २२ सप्टेंबर १९६६ ऐवजी २२ सप्टेंबर १९६५ करण्यासंदर्भात सादर केलेली सर्व कागदपत्रे बनावट असल्याचे परिवहन आयुक्त कार्यालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे बागडी यांनी शासनाची दिशाभूल करून फसवणूक केल्याचा ठपका ठेवण्यात आला. बागडी यांच्या २२ सप्टेंबर १९६४ च्या जन्मतारखेनुसार ते ३० सप्टेंबर २०२२ रोजी डेप्युटी आरटीओ म्हणून सेवानिवृत्त होणे अपेक्षित होते. मात्र, त्यांच्या सेवापुस्तकात खाडाखोड आणि जन्मतारीख ही २२ सप्टेंबर १९६५ तसेच २२ सप्टेंबर १९६६ अशी नमूद असल्यामुळे ते अद्यापही सेवानिवृत्त झाले नाहीत. हा प्रकार म्हणजे शासनाची आर्थिक फसवणूक होय, असा गठित समितीचा अहवाल आहे.

# अमरावती येथील जिल्हा क्रीडा संकुलला पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्यके दाजीसाहेब पटवर्धन नाव द्या

## भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस बादल कुलकर्णी यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती** - संत गाडगेबाबा विद्यापीठ समोरील क्रीडा संकुल चे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते पार पडले. यावेळी अमरावती भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस बादल कुलकर्णी यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या जिल्हा क्रीडा संकुलला पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्यके दाजीसाहेब पटवर्धन नाव द्या अशी म्हणी करीत निवेदन दिले . अमरावतीच्या इतिहासातील महत्त्वाचे पान आणि अमरावतीच्या क्रीडा,शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये विशेष कामगिरी केलेले, तथा दिन दुःखी शोषित यांच्या सेवेकरिता आपल्या अखंड आयुष्य वाहून देणारे , यासोबतच भारताच्या स्वातंत्र्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण विषयांमध्ये सक्रिय सहभाग व नेतृत्व करणारे,तपोवन येथील विदर्भ महारोगी सेवा मंडळ चे संस्थापक तसेच 'हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ' अमरावती चे अध्यक्ष म्हणून दहा वर्ष सेवा दिलेले नाव म्हणजेच 'पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन'एवढे भरीव आणि महत्त्वपूर्ण योगदान या महापुरुषाचे अमरावती करिता, क्रीडा क्षेत्राकरिता व एकंदरीत सर्व क्षेत्राकरिता आहे त्यांच्या नावे अमरावती मध्ये एकही मोठी वास्तू



नाही, त्यांचा क्रीडा क्षेत्राशी थेट संपर्क होता त्यांच्या अध्यक्षतेच्या कार्यकाळामध्ये हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथील चमू ऑलिंपिक खेळण्याकरिता विदेशात गेला होता अशा क्रीडा क्षेत्राकरिता महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या महापुरुषाचे म्हणजेच अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठ समोरील क्रीडा संकुल तथा नवीन तयार झालेल्या जिल्हा क्रीडा संकुल तथा स्टेडियमला 'पद्मश्री डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन' असे नाव द्यावे जेणे करून येथे खेळायला येणाऱ्या खेळाडूंना दाजीसाहेब पटवर्धन या नावाची एक शक्ती प्राप्त होईल व इतिहासाला ते जुडून राहतील करिता हे नाव द्यावे ही विनंती भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस बादल कुलकर्णी यांनी अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे केलेली आहे..

# धार्मिक सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी घेतली बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८ अमरावती**- धार्मिक सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी शनिवारी (ता.१७) अधिकाऱ्यांची सर्व बैठक घेऊन त्यांना महत्वाच्या सुचना दिल्या. शहरात कुठलीही घटना घडल्यास अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचा जलद प्रतिसाद मिळाला पाहिजे, असे स्पष्ट आदेश दिले. धार्मीक सण, उत्सव



लक्षात घेता पोलीस आयुक्तांनी डीसीपी, एसीपीसह सर्व ठाणेदारांची बैठक बोलावून त्यांना महत्वाच्या सुचना दिल्या. रक्षाबंधन, श्रीकृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी, पोळा, मंगळागौरी असे सण येत्या काही दिवसात आहेत. बाजारपेठमध्ये खरेदीकरिता महिलांची गर्दी होईल.

सर्व ठाणेदारांनी अलर्ट असणे गरजेचे असून एखादी घटना घडल्यास क्विक रिस्पॉन्स मिळणे गरजेचे आहे, असे स्पष्ट आदेशदिलेत. तसेच शहरात सुरु असलेल्या अवैध हुक्का पार्लर व स्पा मसाज सेंटरबाबत माहिती घेऊन त्यांच्यावर त कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

# लाडकी बहिण योजनेत मिळालेल्या रक्कमेतून बँकेने सुरू केली दंड वसूली

## दर्यापुर-अंजवगावात धक्कादायक प्रकार उघडकीस : बँका विरुद्ध तीव्र आंदोलन करणार - सिमा सावळे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेचे पैसे महिलांच्या खात्यात आले आहेत. हे पैसे मिळवण्यासाठी अनेक महिलांनी पोस्ट ऑफिस आणि बँकांमध्ये प्रचंड गर्दी केली आहे. परंतु काही महिलांच्या हाती पैसे येऊनही निराशा आली आहे. लाडकी बहिणी योजनेतून प्राप्त झालेल्या रकमेतून बँकांची वसुली सुरु केली आहे. लाडकी बहीण योजनेत मिळालेल्या रक्कमेतून मिनिमम बॅलन्सच्या नावाखाली बँकांकडून सुरु असलेली वसुली तातडीने थांबविण्यात यावी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री यांनी तातडीने आदेश काढावेत. तसेच बँकांनी मिनिमम बॅलन्सच्या नावाखाली कापलेली रक्कम त्वरित महिलांच्या खात्यात वर्ग करावी आणि यापुढे अशी वसुली करू नये, अन्यथा अश्या बँकांविरुद्ध तीव्र आंदोलन करण्याचा इशारा स्थायी समितीच्या माजी सभापती सीमा सावळे यांनी दिला.

राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेचे पैसे गेल्या दोन दिवसांपासून पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होऊ लागले आहेत. पण अनेक ठिकाणी महिलांना हे पैसे मिळून काहीच उपयोग झाला नाही. राज्यातील अनेक महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये आल्यावर देखील त्यांच्या खात्यातून पैसे गायब झाले आहेत. यामुळे महिलांना आश्चर्याचा धक्काच बसला आहे. राज्य सरकारने लाडक्या बहिणीची ओवाळणीचे ३ हजार रुपये खात्यात जमा केले, पण मिनिमम बॅलन्सच्या (कमीत कमी जमा) नावाखाली बँकेने दंड वसूल केल्याने महिलांच्या हाती काहीच उरले नाही तर काही ठिकाणी ५०० ते १ हजार रुपये खात्यात शिल्लक राहिले आहेत. महिलांच्या खात्यात जमा झालेल्या तीन हजार रुपये रक्कमेपैकी हातात काही मिळत नसल्याने महिला खातेदार अक्षरशः हैराण झाल्या आहेत. बाकीची रक्कम कुठे गायब झाली ? असा सवाल या महिला करत आहेत.



दर्यापुर-अंजवगाव परिसरातील काही महिला माझ्याकडे तक्रार घेऊन आल्या. दर्यापुर-अंजवगाव येथील बँकेत हा प्रकार घडला असल्याने इतर ठिकाणी माहिती घेतली असता असा प्रकार अनेक ठिकाणी घडला असल्याचे समोर आले आहे . काही ठिकाणी नवऱ्याच्या किंवा आई-वडिलांच्या जॉइंट अकाउंट मध्ये जमा झालेल्या पैश्यातून सुद्धा बँकांनी दंड / कर्ज वसुली सुरु केली आहे.

**सिमा सवळे**

## धारगड यात्रेला उद्यापासून सुरुवात:सातपुड्याच्या पर्वतरांगामध्ये गुंजणार हर हर महादेवाचा गजर

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १८ मेळघाट**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अतिसंरक्षित गाभा क्षेत्रात असलेल्या धारगड येथील महादेव यात्रेला श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारला सुरवात होणार असून शिवभक्त 'हर हर बोला महादेव'चा गजर करत निसर्ग सौंदर्याचा आनंद घेत याहीवर्षी हजारोंच्या संख्येने दाखल होणार आहेत.निसर्ग सौंदर्य आणि अध्यात्माचा सुरेख संगम असलेल्या या धारगड यात्रा महोत्सवाला दि १८ ऑगस्ट २०२४ पासून सुरवात होणार १९ तारखेला सायंकाळी ६ वाजेपर्यंत मंदिर परिसर तसेच खटकाली नाका येथून भाविक-भक्तांना बाहेर पडणे बंधनकारक राहणार आहे. सातपुड्याच्या पर्वतरांगांमध्ये ३ हजार फूट उंचीवर नरनाळा किल्ल्याच्या छातीशी वसलेले धारगड येथील शिवमंदिरात चारकोनी गुहा असून त्यात दोन स्वयंभू शिवलिंग व नंदी आहे.

# झटपट मिळणार पासपोर्ट; तीन दिवसांत पोलिस व्हेरिफिकेशन

## परदेशवारीसाठी अडचणी झाल्या कमी : आठवडाभरात प्रक्रिया पूर्ण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

व्यापार, शिक्षण, नोकरी व अन्य विविध कारणांमुळे नागरिकांना परदेशात जावे लागते. यासाठी शासनाकडून पासपोर्ट मिळणे आवश्यक असते. पासपोर्ट प्राप्त करण्यासाठी अनेक दिवसांचा कालावधी लागायचा. यातही पोलिस व्हेरिफिकेशनची प्रक्रिया अनेक दिवस रेंगाळत असे; परंतु आता तीन दिवसांत पोलिस व्हेरिफिकेशन होणार आहे. यामुळे पासपोर्ट झटपट मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे.

परदेशात जाण्यासाठी पासपोर्ट तयार करावे लागते. पासपोर्ट व्हेरिफिकेशनसाठी बराच वेळ लागत असे; परंतु आता हा वेळ कमी झालेला आहे. केवळ ३ दिवसांत पोलिस व्हेरिफिकेशनची प्रक्रिया पूर्ण होईलपासपोर्ट तयार करण्यासाठी 'पासपोर्ट इंडिया' या वेबसाइटवर अर्ज करावा लागतो. आवश्यक कागपत्र अपलोड करावी लागतात. त्यानंतर आपल्या अर्जाची पडताळणी होते.

**हेलपाटे थांबले**

परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना पासपोर्ट तयार करावे लागते. आपल्या पासपोर्टचे व्हेरिफिकेशन झाले की नाही, याची उत्सुकता असायची. त्यांना वारंवार संबंधित कार्यालयात हेलपाटे मारावे लागत होते, तसेच चौकशी करावी लागत होती. आता हेलपाटे थांबलेले आहेत.

असा घटला अवधीपासपोर्टकरिता पोलिस व्हेरिफिकेशनसाठी मागील वर्षी १५ दिवसांचा कालावधी लागत होता. त्यानंतर हा कालावधी पाच दिवसांचा करण्यात आला होता. आता पुन्हा त्यात घट करण्यात आली आहे.

**व्हेरिफिकेशनसाठी काय कागदपत्रे लागतात ?**

पासपोर्ट तयार करण्यासाठी आधार कार्ड, जन्म प्रमाणपत्र, आई- वडिलांचे पासपोर्ट यांसह अन्य कागदपत्रे लागतात. आई- वडिलांचे पासपोर्ट नसल्यास पासपोर्टची फाइल करावी लागते.

नागरिकांना पासपोर्टकरिता पोलिस पडताळणीच्या जटील प्रक्रियेचे पालन करावे लागेलच; पण ते सोपे केलेले आहे.

# महामंडळाच्या दोन बस वलगाव पुलावर पडल्या बंद

## अमरावती परतवाडा दोन तास वाहतूक ठप्प



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

अमरावती परतवाडा रोडवर वलगाव रेल्वे पुलावर शनिवारी रात्री ८.३० वाजल्यापासून १०.३० वाजेपर्यत गेल्या दोन तास वाहतूक ठप्प झाली. याचा फटका पोलीस विभाग,अँब्युलन्स व सामान्य नागरिक यांना चांगलाच बसला.

अत्यंत वर्दळ असलेल्या वलगाव पुलावर शनिवारी रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान एस.टी. महामंडळाच्या दोन बस एकाच वेळी फेल पडल्याने मोठा गोंधळ उडाला त्यातली एक शिवशाही होती तर दुसरी लालपरी होती एक बस अमरावती कडे येत होती तर दुसरी बस ही परतवाडा कडे निघाली होती मात्र वलगाव जवळच्या पुलाच्या मध्यभागी आल्यावर राज्य परिवहन महामार्गाच्या दोन बसेस अचानक फेल झाल्यामुळे ही वाहतूक कोंडी झाली आहे निकृष्ट दर्जाच्या बसेसमुळे अनेक दुचाकी चालकांना व चारचाकी चालकांना मोठा त्रास झाला. काही म्बुलन्स देखील या वाहतूक कोंडीत अडकून पडल्या होत्या अनेक रुग्णांचे हाल देखील मोठ्या प्रमाणात झाले आहे महिलांना देखील मोठ्या प्रमाणात त्रास झाला आहे.

# मुख्यमंत्री पदाबाबत चर्चा झाली, लहान माणसांनी यावर बोलू नये,अंबादास दानवे यांचा नाव न घेत लगावला टोला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८लाखांदूर**




महाविकास आघाडीत मुख्यमंत्री पदाचा वाद वाढणार आहे. त्यामुळे काँग्रेसला मान्य नसेल तर जाहिर करावं असं वक्तव्य अंबादास दानवे यांनी केलं आहे. यावर उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सांगीतले की मी लहान माणसाबाबत काही बोलत नाही. कालच माझी उध्दव ठाकरे, शरद पवार यांच्यासोबत चर्चा झाली आहे. त्यामुळे यावर लहान माणसांनी यासंदर्भात आपलं नाक खुपसू नये म्हणजे झालं असं म्हणत त्यांनी अंबादास दानवे यांचा नाव न घेत त्यांना टोला लगावला. लाखांदूर येथे काँग्रेसच्या हल्लाबोल आंदोलनात आले असता नाना पटोले माध्यमांशी बोलत होते.

राहुल गांधी महिला अत्याचाराचा निषेध करायला हाथरस आणि मणिपूरला गेले होते. कोलकत्ता कधी जाणार या प्रश्नावर आ.नाना पटोले म्हणाले, राहुल गांधी हे देशाच्या प्रत्येक समस्येवर लक्ष देणारे असे एक नेतृत्व आहे. पण नरेंद्र मोदी पंतप्रधान आहेत. त्यांनीही या सगळ्या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवं. राहुल गांधींकडून अपेक्षा होणं स्वाभाविक आहे. पण आपण १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावर त्यांना मागच्या बाकावर बसवून पाहिले. जो धडधडीत अपमान या संविधानाच्या आणि लोकशाही व्यवस्थेचा नरेंद्र मोदींनी राहुल गांधीच्या माध्यमातून केला हे संपूर्ण देशानी पाहिलं आहे.

पुढे एका प्रश्नाच्या उत्तरात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की राज्यातील महायुती आणि केंद्रातील सरकार हे शेतकरी विरोधी आहे. गरीबांच्या विरोधी आहे. लाखांदूर तालुक्यात मागील दिवसांत झालेल्या अतिवृष्टीमुळे घरे पडली आणि शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झालं, २५० मिलिमीटरच्या वर पाऊस या भागात पडला पण याची या सरकारने साधी दखल सुद्धा घेतली नाही. येथे ओला दुष्काळ जाहीर करून मदत न करणे ही पण गंभीर बाब आहे. येथे गरीबांना राहायला घरे नाहीत. यामुळे येथील जनतेत आक्रोश निर्माण होणं स्वाभाविक आहे. अश्या परिस्थितीमुळे लाखांदूरच्या नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत याला विरोध करण्याकरिता काँग्रेसच्या वतीने लाखांदूर मध्ये शनिवारी १७ किलोमीटरची पदयात्रा करण्यात आली. त्याचे निवेदन परवा मुंबईला जाऊन राज्याच्या मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांना भेटून त्यांच्याकडे येथील सर्व व्यथा मांडून तातडीने येथील शेतकऱ्यांना मदत करावी अशी मागणी आम्ही करणार आहोत. नाही केलं तर पुढील निवडणुकीत येथील जनता या शेतकरी विरोधी सरकारला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही.

या सरकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था बाबतीत काय मानसिकता आहे हे यामुळे स्पष्ट होत आहे. हे सरकार याबाबतीत लक्ष द्यायला तयार नाही त्यामुळे या बेशरम सरकारवर काय बोलावं हेच मला कळत नाही असे नाना पटोले म्हणाले.

# शिवसंग्राम विधानसभेच्या ५ जागा लढवणार; ज्योती मेटे स्वत: निवडणुकीच्या रिंगणात, बीड मधून चाचपणी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८बीड**

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला जोरदार सुरुवात झाली आहे. महायुती अन् महाविकास आघाडीबरोबरच मनसे, वंचित बहुजन आघाडी, व इतर घटक पक्षही या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनीसुद्धा सरकारला अल्टिमेटम देत विधानसभा लढविण्याचे संकेत दिले आहेत. अशातच शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक दिवंगत विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटेही स्वतः विधानसभा लढवणार असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले आहे.

पुण्यात आज शिवसंग्राम पक्षाची सर्वसाधारण सभा पार पडली. सभेत शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्ष म्हणून ज्योती मेटे यांची निवड करण्यात आली आहे. राज्यातील सर्व सभासद या सभेला उपस्थित होते. आगामी काळातील राजकीय भूमिका काय यावर चर्चा झाली. तसेच नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. मेटे म्हणाल्या, शिवाजी महाराज स्मारक आणि मराठा आरक्षण यावर सभेत चर्चा झाली असून याबाबत मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत. अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक आणि कायदेशीर मराठा आरक्षण हे कोणी देईल. आम्ही त्यांच्यासोबत जाणार आहे. महायुती आणि महाविकास आघाडी या दोघांशी आमची चर्चा सुरू आहे. या विधानसभेला शिवसंग्राम किमान ५ विधानसभा जागा लढवणार आहे. मुंबई, कोकण. विदर्भ मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र पाच विभागात पाच जागा पाहिजेत. मी स्वतः निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असून सध्या बीड मधून चाचपणी सुरू आहे. आम्हाला निवडणुका ज्या ठिकाणी जिंकेल असं वाटत त्याच ठिकाणी आम्ही लढवणार आहोत.

**ओबीसीतून आरक्षण मिळावे हीच मेटेंची मागणी**

आरक्षण मुद्द्यावर सरकारने सर्वपक्षीय बैठकीला बोलावलं तर आम्ही जाऊ. आम्हाला बोलावलं पाहिजे अशी आमची भूमिका आहे. कारण मेटे साहेब आरक्षणासाठी अनेक वर्ष लढत होते. त्यामुळे आम्हाला बोलावलं पाहिजे. जाती आणि समाजाचा निर्णय नाही तर मानसिकतेचा मुद्दा आहे. मेटे यांची पण ओबीसी मधून आरक्षणाची मागणी होती. आजही ओबीसी मधून आरक्षण मागणी आहे. समाजाचे हित लक्षात घेऊन मराठा आरक्षण मागणी जरांगे पाटील करत आहे. मन दुभंगले नाही पाहिजे याची काळजी सरकारने घ्यायला हवी.

# शहर बस सेवेतून मिळणार सुरक्षित प्रवासी वाहतुकीला गती : आ.सौ. सुलभाताई खोडके

## छत्रपती संभाजीराजे चौक येथील शहर बस थांबा सेवेचा थाटात शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

कधीकाळी हॉटेल - ढाबांचा चौक अशी ओळख असलेला नवसारी रिंगरोड चौक आज छत्रपती संभाजी महाराज चौक म्हून नावारूपास आला आहे. या चौकातून वाढती वर्दळ लक्षात घेता नवसारीपर्यंतची शहर बस सेवा आता संभाजी राजे चौकापर्यत विस्तारित करण्यात आली आहे. रविवार दिनांक १८ ऑगस्ट २०२४ रोजी येथील शहर बस थांबा सेवेचा शुभारंभ अमरावतीच्या आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या हस्ते करण्यात आला. त्यामुळे आता अमरावती महानगर पालिकेची शहर बस सेवा जुन्या नवसारी थांबा वरून पुढे छत्रपती संभाजी महाराज चौकापर्यंत सुरु झाली आहे. यावेळी आमदार महोदयांनी नामफलकाचे अनावरण करून व फीत कापून शहर बस थांबा सेवेचा शुभारंभ केला.

याप्रसंगी पुढे बोलतांना आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सांगितले की, नवसारी प्रभागवासीयांच्या स्थानिक गरजा व मागणी लक्षात घेता या परिसरामध्ये पायाभूत सुविधांची पूर्तता करण्यावर आपला विशेष भर राहिला आहे. परिसरातून मोठी वाहतुकीची वर्दळ



असल्याने रस्ता चौपदरीकरण करण्यात आले आहे. आता स्थानिक नागरिकांना सुरक्षित प्रवास व अपघातविरहित परिवहनाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून मनपाच्या शहर बस सेवेचा विस्तार करण्यात आला आहे. यातून विद्यार्थी, महिला , जेष्ठ नागरिक तसेच कामगार व नोकरदार वर्गाला सुविधा मिळाली असून त्यांच्या दैनंदिन जीवनात गतिमानता आली असल्याचे मनोगत आमदार महोदयांनी व्यक्त केले.

नवसारी परिसराचा झपाट्याने विस्तार होत असल्याने स्थानिक भागातील नागरिकांना शहरात जाण्यासाठी शहर बस सेवेचे माध्यम आहे. आधी नवसारी स्टॉप पर्यंत बस सेवा होती, आमदार सौ सुलभाताई खोडके यांच्या प्रयत्नाने आता छत्रपती संभाजी राजे चौकापर्यंत सेवेचा विस्तार होऊन शहर बस थांबा सुरु झाल्याने स्थानिक नागरिकांना चांगली सुविधा उपलब्ध झाली असल्याचे मनोगत माजी नगरसेवक प्रशांत डवरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे अंती ऋतुराज राऊत यांनी सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.दरम्यान आ.सौ.सुलभाताई खोडके यांच्या समवेत स्थानिक प्रवाश्यांनी आमची परिवहन मनपा शहर बस मध्ये प्रवास करून प्रवासाचा आनंद लुटला. यावेळी स्थानिक नागरिक व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रिती संजय बंड याच बडनेऱ्यातील सक्षम उमेदवार मतदारांकडूनही पसंती, सर्वेक्षणातही सर्वात पुढे

## विद्यमान आमदाराला टक्कर देऊ शकणाऱ्या एकमेव उमेदवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**



लोकसभा निवडणूकीत महायुतीच्या पराभवानंतर आता बडनेऱ्यातील विद्यमान आमदाराला टक्कर देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून लोकनेते माजी आमदार संजय बंड यांच्या पत्नी महिलांचे सक्षम नेतृत्व प्रीती बंड यांचेच नाव सर्वाधिक चर्चेत आहेत. सर्व समावेशक उमेदवार असलेल्या प्रीति बंड यांच्या पाठीशी पूर्वीपासूनचा पारंपारिक मतदार मोठ्या संख्येने असून सच्चा शिवसैनिक आज देखील बंड कुटुंबाला तेवढेच महत्त्व देत असल्याने बडनेरा मतदार संघातून प्रीति बंड यांची उमेदवारी सर्वाधिक प्रबळ मानली गेली आहे. एका खासगी कंपनीने केलेल्या राजकीय सर्वेक्षणात ही बाब उघड झाली असुन मातोश्रीवर देखील यावर चर्चा झाल्याची माहिती आहे. बाहेरुन आणि इतर पक्ष फिरुन आलेल्या उमेदवारांनी शिवसेनेकडे उमेदवारीसाठी जंग पछाडले असले तरीही मातोश्रीवर आजही निष्ठावंतांना प्राधान्य दिले जात असल्याने प्रीति बंड या सर्वाधिक लोकप्रिय उमेदवार बनल्या आहेत.

विधानसभा निवडणूकांचे निमित्ताने सध्या सर्वत्र राजकीय वातावरण तापले आहे. अमरावती लोकसभेत नवनीत राणा यांच्या पराभवानंतर आता रवी राणा यांच्याविरोधात देखील मोठ्या प्रमाणात नाराजीचे वातावरण आहे. परंतू राणा यांना या निवडणूकीत शह द्यायचा असेल तर शिवसेनेसारख्या पक्षाकडून एक चांगला, प्रामाणिक व सर्व समीकरणांमध्ये बसणारा उमेदवारच ही बाजी मारू शकतो. विशेष म्हणजे सर्वसमावेशक आणि इतरांना चालणारा प्रामाणिक चेहरा या मतदारसंघात आवश्यक आहे. सध्या बडनेरा मतदारसंघात उमेदवारांची भाऊगर्दी झाली असून त्यात शिवसेनेकडे इच्छुकांची गर्दी आहे. मागील निवडणूकीत प्रिती बंड यांचा याच मतदारसंघात निसटता पराभव झाला होता. त्यामुळे पुन्हा एकदा स्व. संजय बंड यांच्याप्रती शिवसैनिकांची असलेली श्रद्धा आणि मतदारांमध्ये बंड कुटूंबावर असलेला विश्वास लक्षात घेता प्रिती बंड यांच्यासारख्या सर्वसामान्य उमेदवारालाच मतदार पसंती देऊ लागले आहेत.

शिवसेनेकडून चर्चेत असलेल्या उमेदवारांमध्ये प्रिती बंड यांच्यापाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर अनंत गुढे, त्यानंतर ज्ञानेश्वर धाने पाटील, सूनील खराटे, सागर देशमुख, पराग गुडधे यांच्या नावाची चर्चा आहे. या निवडणूकीत मातोश्रीवर बडनेरा मतदारसंघात उमेदवारी देण्याच्या विषयावरून अनेक खलबते सुरू असून काही वरिष्ठ नेत्यांच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांच्याकडे लॉबींग सुरू आहे. मात्र बंड कुटूंबाकडे एक निष्ठावंत म्हणून थेट उद्धव ठाकरे यांच्याकडे वजन असताना शिवसेना नेमकी कोणाच्या पाठिशी उभी राहते याकडे आता मतदारांचेही लक्ष लागले आहे. यंदाच्या लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी प्रीती बंड या प्रामाणिकपणे प्रयत्नरत होत्या. त्यामुळे सध्या उद्धव ठाकरे गटाकडून प्रिती बंड यांच्या नावाचे पारडे जड आहे. महाविकास आघाडीचे विविध पक्षातील अनेक चांगले नेते देखील बंड कुटूंबांसाठी पॉझिटिव्ह असल्याचे दिसून येते. मात्र पैश्यांच्या खेळात कोण बाजी मारणार ? हे ठरविण्याची जबाबदारी आता उद्धव ठाकरे यांच्यावर येऊन पडल्याचे दिसते.

### बडनेरा मतदारसंघात सर्वाधिक उधळण

प्रिती बंड यांना वगळता अन्य सर्व उमेदवारांनी आपल्याकडे असलेल्या अर्थशक्तीच्या जोरावर मतदारांना स्वत:कडे आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या खिरापतीचे वाटप सुरू केले आहे. त्यात विद्यमान आमदार देखील कुठेच मागे नाहीत. मात्र कुठेतरी सर्वसामान्य आणि पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या बंड कुटूंबाकडे आर्थिक शक्ती तेवढ्या प्रमाणावर उपलब्ध नसली तरीही त्यांचा जनाधार हा सर्वात मोठा असल्याचे राजकीय सर्वेक्षणातील निष्कर्षात दिसून येते. विशेष म्हणजे संजय बंड यांच्यासारख्या लोकनेत्यांनी देखील पैश्याचा वापर न करता केवळ मतदारांच्या विश्वासावरच निवडणूका जिंकल्या आहेत. अमरावती जिल्ह्याला अशी अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे यावेळी बडनेरा मतदारसंघातील मतदार आमिषांच्या मोहजाळात न पडता योग्य उमेदवाराला निवडून देतील अशी परिस्थिती सध्या दिसून येत आहे.

## प्रा. हेमंत देशमुख यांची भातुकली परिसरात बैठक : नागरिकांशी साधला संवाद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावतीराष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने भातकुली परिसरातील नागरिकांना प्रत्यक्ष भेटून शहराध्यक्ष प्रा. हेमंत देशमुख यांनी समस्या जाणून घेतल्या.आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्ष मोठ्या प्रमाणात यश मिळविण्यासाठी मैदानात उतरलेला आहे. अमरावती जिल्ह्याततील सर्वच विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीला चांगल्या जागा जिंकता याव्या याकरिता राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावे अशा सूचना शहराध्यक्ष हेमंत देशमुख यांनी बैठकीदरम्यान दिल्या. विविध गावांना भेटी देऊन हेमंत देशमुख यांनी तेथील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या या सोबतच अद्याप पर्यंत जी विकास कामे झालेली नाही त्यासाठी आपण प्रयत्न करू असे आश्वासन नागरिकांना दिले. भातकुली येथे विविध ठिकाणी बैठकी घेऊन प्राध्यापक हेमंत देशमुख यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शहर युवक अध्यक्ष रोशन कडू प्रथमेश भगत निखिल भोजे,सर्वेश खेडकर, वेदांत उगले यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यावेळी झालेल्या बैठकीला वैभव ठाकरे, जावेद शेख ,शाकीर अली ,प्रणित काजळे,सूमित जदाले, राहूल वानखडे.,आस्तिक पारसे, निकेत मोहोड,सदर अली, ऋषिकेश कचरे, नारायण रेहपाडे, सुधाकर कचरे,सुधीर देशमुख,प्रतिक खडसे,निखील पुनसे, यांच्या सहकार्यकर्त्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती

# बच्चू कडूंचे घर बनत आहे अमरावतीच्या राजकारणाचे केंद्र

## शरद पवार यांच्यानंतर आता चंद्रकांत पाटलांचीही बच्चू कडूंच्या घरी भेट





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

अचलपूर विधानसभा मतदारसंघातून सलग चार वेळा अपक्ष म्हणून निवडून येणारे प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख व आमदार बच्चू कडू यांनी राज्यातही स्वतःची एक वेगळी अशी ओळख करत जनतेतून लक्षणीय समर्थन मिळवल्याने विविध राजकीय पक्षांची प्रमुख नेतेमंडळी आ. कडू यांच्या संपर्कात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आ. कडू यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेत त्यांना आपल्याकडे वळवण्यासाठी प्रयत्न होताना दिसत आहेत. या भेटींमागे काही राजकीय गणिते आहेत का याच्याच चर्चा सध्या राज्यात रंगताना दिसत आहेत.

मागील वर्षी डिसेंबर महिन्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख शरद पवार हे दोन दिवसांच्या अमरावती दौऱ्यावर असताना त्यांनी आ. बच्चू कडू यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली होती. मागील काही दिवसांपूर्वी देखील शरद पवार आणि आ. कडू यांची भेट झाली होती. त्यामुळे ही भेट नव्या राजकीय गणितांची नांदी आहे का असा प्रश्न अनेकांना पडला होता. मात्र पवारांसोबतची आपली भेट ही राजकीय व सामाजिक विषयांसोबतच प्रामुख्याने शेतीसंबंधी अनेक विषयांवर झाल्याचे बच्चू कडू यांनी स्पष्ट केले. शेती मधील पेरणी ते कापणी पर्यंतची सर्व कामे ही रोजगार हमी योजनेतून झाली तर उत्पादन खर्चात बचत होईल या दृष्टीने आ. कडू हे सातत्याने प्रयत्न करत असल्याचेही विधिमंडळ अधिवेशनादरम्यान दिसून आले आहे.

दुसरीकडे काल भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी देखील आ. कडू यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. आ. कडू हे महायुतीतून बाहेर पडणार असल्याच्या चर्चा मागील काही दिवसांपासून रंगत आहेत. लोकसभा निवडणुकीत सांगता सभेसाठी अमित शहांच्या सभेसाठी ऐनवेळी मैदानाची परवानगी रद्द केल्यामुळे आ. कडू यांनी भाजपवर सडकून टीका केली होती. काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगर येथे आक्रोश मोर्चा काढून त्यांनी सरकारकडे अनेक मागण्या केल्या होत्या. त्या मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर आपण आगामी विधानसभा तिसरी आघाडी करून निवडणुकांना सामोरे जाणार असल्याचा इशारा आ. कडू यांनी दिला होता. त्या पार्श्वभूमीवर त्यांची समजूत काढण्यासाठी भाजपने कंबर कसल्याचे दिसून येत आहे. चंद्रकांत पाटील हे आ. कडू यांची नाराजी दूर करण्यासाठीच त्यांच्या निवासस्थानी गेल्याचे बोलले जात आहे. मात्र या भेटीनंतर आ. कडू यांनी 'शरद पवार चहा प्यायला आले होते, चंद्रकांत पाटील हे जेवण करायला आलेत' असे मिश्किल उत्तर देऊन या भेटींमागचे गूढ कायम ठेवले आहे.

# बोले तैसा चाले......राणा दाम्पत्यांनी दारसिबे कुटुंबियास बांधून दिले घर : धोदरा गावात स्वत:जावून नवीन घराच्या दिल्या चाब्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**



होळीच्या दिवशी मेळघाटातील धोदरा गावातील ६ वर्षाचा नातू व ४ वर्षाची नात तसेच मुलगा आणि सून अशा चौघांचा अपघाती मृत्यू झाला होता. या अपघातामुळे निराधार झालेल्या ८५ वर्षीय आई पारवती व वडील नंदलाल दारसिबे मातापित्यांना दिलेला शब्द खा. नवनित राणा व आ.रवि राणा यांनी पाळत व मानवतेचा परिचय देत ८५ वर्षीय वृद्धआदिवासी दारसिबे कुटुंबाला दत्तक व घेवून स्वखर्चातून ३ लाखाचे घर व दिले बांधून दिले. या नवीन घराची स फीत कापून दारसिबे कुटुबियांना खा. नवनित राणा यांनी धोदरा गावात स्वतः जावून नवीन घराच्या चाब्या दिल्या. होळीच्या दिवशी आपल्या कुटंबियांसमवेत धारणी येथील - बाजार आटोपून आपल्या कुटुंबियाना - सोबत घेवून दुचाकीने आपल्या गावी जात असणाऱ्या दारसिंबे कुटुंबियांना एका कारचालकाने धडक देवून उडविले. एकाच कुटुंबातील ६ वर्षाचा नातू व ४ वर्षाची नात तसेच मुलगा आणि सून यांच्या अशा ४ जणांचा जागेवरच अपघाती मृत्यू झाला. ही हृदयद्रावक व मन हेलावून टाकणारी बाब कळताच तात्काळ मा. खा. नवनीत रवी राणा व आ. रवी राणा यांनी रुग्णालयात धाव घेवून आपल्या संवेदना प्रकटकेल्या व त्याच वेळेस आर्थिक मदत देऊन एवढ्या मोठ्या दुःखद प्रसंगी आपण एकटे नसून आम्ही सर्व युवा स्वाभिमान परिवार के आपल्या सोबत असल्याचे वचन दिले व त्यासोबतचे खा. नवनित राणा यांनी एक सामाजिक दायित्व जोपासून व आपले नैतिक कर्तव्य मानून नुसतेच सांत्वन न करता निराधार दारसिबे कुटुंबियाला दत्तक घेवून घर बांधुन देण्याचे वचन दिले होते. तेच वचन पाळत खा. नवनित राणा व आ.रवि राणा यांनी स्वताच्या खर्चातून ३ लाख रुपयाचे संपूर्ण घर बांधुन दिले व एकप्रकारे मानवतेचाच परिचय दिला व तसेच संपूर्ण मेळघाट च्या बेटीचे कर्तव्य पार पाडले. नुकताच नवीन घराचा ताबा दारसिबे कुटुंबियांना देण्याकरिता स्वतः आपल्या कार्यकर्त्यांसोबत धोदरा गावात जावून नविन घराची फीत कापून उद्घाटन सुद्धा मा. खा. नवनित राणा यांनी केले.दारसिंबे कुटुंबियाच्या हस्ते नवीन घराच्या चाब्या सोपवल्या व नवीन कपडे सुद्धा दिले, यावेळेस संपूर्ण दारसिंबे कुटुंब भावनाप्रधान होवून मा. खा. नवनित राणा यांचे आभार व्यक्त केले. यावेळेस संपर्क प्रमूख उपेन बछले, दुर्योधन जावरकर, राजा पाटील, मुकेश मालविय, नीरज मालविय, गायत्री धोत्रे, मुन्नी भिलावेकर, मोनू मालविय, राजा मालविय, प्रमोद मानेकर, सोनू धनेवाल, ॲड. भरत मालविय, रामदासजी धोत्रे, दिपक प्रजापती, मयुर बनसोड, नामदेव सुरडकर, ॲड. कोगेकर, निलेश मालविय व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# सराफा व्यावसायिक विक्की अनासाने वर परतवाड्यात गुन्हा दाखल : कर्ज वसुलदारांना चकमा देण्यासाठी केला होता बनाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

परतवाडा नजीकच्या भुगाव मार्गावर वाहन खराब झाल्यामुळे अज्ञात लुटारूंनी मदतीचा आव आणून आपल्या जवळील ६५ लाख रुपए किमतीचे ९०० ग्रॅम सोने लुटले असल्याची खळबळजनक तक्रार अमरावती येथील एका सराफा व्यापाऱ्याने २६ जुलै रोजी परतवाडा पोलिस ठाण्यात दिली होती. परंतु, तक्रारकर्ते हे वारंवार बयान बदलत असून सोने आणले कुठून, परतवाडयाला कशासाठी आले होते, हे त्यांना नीट सांगता येत नसल्याने तक्रारीमागचा डमी गेम ओळखण्यासाठी परतवाडा पोलिसांनी सोनाराची उलट तपासणी केली असता कर्ज वसूलदारांना चमका देण्यासाठी लुटमारीचा बनाव आणल्याची कबूली दिल्याने परतवडा पोलिसांनी सोनारावर खोटी तक्रार दिल्याबाबतचा गुन्हा दाखल केला आहे.

विक्की सुनील अनासाने, रा. नरहरी मंगल कार्यालय परिसर, अमरावती हे तक्रारकर्त्या सराफा व्यावसायिकांचे नाव आहे. विक्की अनासाने यांनी २७जुलैला सायंकाळी परतवाडा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, ते दुपारी ४ वाजताच्या सुमारास अमरावतीहून त्यांच्या एमएच-२७-बीव्ही-८७५५ क्रमांकाच्या मारोती स्विफ्ट कारने चांदुरबाजार मार्गे परतवाडा येथे येत होते. परंतु, वाटेत भुगाव मार्गावर नारायण पेट्रोल पंपासमोर त्यांची कार खराब झाली. तेव्हा अज्ञात तीन ते चार लुटारूंनी मदतीचा आव आणून कारमध्ये बसलेले ६५ लाख किमतीचे




९०० ग्रॅम सोने लुटले, असे विक्की अनासाने यांनी परतवाडा ठाण्यात सांगितले होते. अनासानेंची तक्रार ऐकताच परतवाडा पोलिस हादरले होते. परंतु, जेव्हा पोलिसांनी विक्की अनासानेंचे बयान नोंदवायला सुरूवात केली तेव्हा ते काहीच माहिती देऊ शकले नाही. त्यामुळे परतवाडाचे ठाणेदार संदीप चव्हाण यांनी २८ जुलैला विक्की अनासानेचे बयान घेतले. तेव्हाही त्यांना काही सांगता आले नाही. तसेच कधी ते म्हणतात कार खराब झाली, तर कधी म्हणतात टायर पंचर झाले होते. त्यामुळे बहुतेक विक्की अनासानेंचा हा डमी गेम असावा, असा संशय आला म्हणून पोलिसांनी त्यांची उलट तपासणी सुरूकेली. विक्की अनासाने यांचे मोती नगरात चौकात मोती ज्वेलर्स नामक काही वषार्पासून दुकान आहे. चांदीचे लहान-मोठे दागिने व मंगळसुत्रात लागणारे सोन्याचे

बारीक मनी बनविने हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. विक्की अनासाने यांनी सराफा १. बाजारात एक नवीन दुकान सुध्दा सुरू केली न होती, अशी माहिती पोलिसांनी मिळविली. ५ त्यानुसार विक्की अनासाने हे चांदुर बाजार - मार्गे परतवाडा नजीक चांदुर बाजार फाट्यावर कशासाठी आले, परतवाडा शहरात न येता ते फाट्यावरून अमरावती मार्गावर का वळले, याबाबत विक्की अनासाने पोलिसांना काहीच उत्तर देऊ शकले नाही.तसेच त्यांच्या जवळ ९०० ग्रॅम सोने कुठून आले, कुणाकडून खरेदी केले, त्याची बिले, एवढे सोने असताना एकटा प्रवास का केला, चांदुर बाजारामध्ये कुणा-कुणाला भेटले, परतवाडा किंवा अचलपुर शहरात येण्याचे कारण काय, या प्रश्नाची उत्तरे देखील विक्की अनासाने देऊ शकत नसल्याने अखेर परतवाडा पोलिसांनी त्यांच्यावर खोटी तक्रार दिल्याचा गुन्हा दाखल केला आहे.